# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, वसमतरोड,
## परभणी– ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

ई-मेलः reg_mau@rediffmail.com दूरध्वनीः(०२४५२)२२९७५५

वेबसाईटः www.vnmkv.ac.in फॅक्सः (०२४५२)२२९७५५, २२३५८२


## -:प्रसिध्दीपत्रक:-

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सर्व प्रकल्पग्रस्तांना कळविण्यात येते की, मौ.बलसा ,सायाळा, खानापुर, शेंद्रा, परभणी इ. विद्यापीठ अंतर्गत प्रकल्पग्रस्त नागरीक मोठ्या संख्येने विद्यापीठ अंतर्गत माहितीच्या अधिकाराखाली त्यांच्या कुटुंबातील कोणत्या व्यक्तीस विद्यापीठामध्ये नोकरीत सामामावून घेतले आहे, त्यांचे किती क्षेत्र संपादीत केलेले आहे इ. बाबत माहितीची मागणी करीत आहेत. तसेच काही व्यक्ती प्रकल्पग्रस्तांना विद्यापीठात नोकरी लावण्याचे अमिष दाखवत आहेत व विद्यापीठामध्ये अनावश्यक चौकशी करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

विद्यापीठाने सन-२००९ मध्ये विद्यापीठांतर्गत प्रकल्पग्रस्तांकरीता शासनाच्या परवानगीने विशेष भरती प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांना नियुक्त्या दिलेल्या आहेत. तसेच सदर भरती प्रक्रीये मध्ये काही उमेदवार अपात्र ठरले किंवा ज्यांना लेखी परिक्षेत कमी गुण प्राप्त झालेले आहेत अशांना किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी यापूर्वीच विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांसाठी नोकरीचा लाभ घेतला आहे, अशा प्रकल्पग्रस्तांना विद्यापीठ सेवेत सामावून घेतलेले नाही.

भविष्यातही होणाऱ्या पदभरतीत शासन निर्णया प्रमाणे प्रकल्पग्रस्तांकरीता नियमाप्रमाणे आरक्षण ठेवण्यात येईल व भरती प्रक्रीया पार पाडली जाईल. तरी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांनी विद्यापीठ सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा नोकरी बाबत वारंवार विचारणा करु नये. तसेच विद्यापीठ प्रशासन हे नियमानुसार प्रकल्पग्रस्तांकरीता कार्यवाही करीत आहे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता विद्यापीठास सहकार्य करावे, असे विद्यापीठामार्फत सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येत आहे.

**मा.कुलगुरु यांचे मान्यतेने**

(रणजीत आ.पाटील)
**कुलसचिव**

जा.क्र.अेअे-२/विमकअ/२०२०
दिनांक: १ जुलै २०२०

**प्रत**:१. मा.संपादक दै. लोकमत (परभणी वार्ता) यांना माहितीस्तव देऊन कळविण्यात येते की, सदर प्रशिध्दीपत्रक आपल्या दैनीकात बातमी स्वरुपात प्रशिध्द करावे हि विनंती.

२. मा.कुलगुरु वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव.

३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देऊन कळविण्यात येते की, प्रशिध्दीपत्रक विद्यापीठ वेबसाईट वर प्रसारीत करावे.